# महाराष्ट्र शासन
## वैद्यकिय अधिकारी, गट-अ ची पदे भरण्यासाठी जाहिरात

**संदर्भ :-**

१. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.आरटीआर-१०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३ दिनांक ३० आक्टोंबर २०००
२. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/४५८/प्र.क्र.३७५/०७/सेवा-३ दिनांक २१ मे २००९
३. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१००७/३७५/प्र.क्र.३७५/सेवा-३ दिनांक १० जून २००९
४. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७७/०७/सेवा-३ (नि.म.), दिनांक २१ मे २००९
५. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/३७५/प्र.क्र.७७६/सेवा-३ दिनांक १४ डिसेंबर २०११
६. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७८९/सेवा-३ दिनांक १८ जुलै २०१३
७. शासनपत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१११३/७८९/४४५/१३सेवा-३ दिनांक २७ सप्टेंबर २०१३
८. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०१/३७५/प्र.क्र.७४५/११/सेवा-३ दिनांक ३ आक्टोंबर २०१३
९. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक - संकिर्ण २०१५/प्र.क्र.१२/निवडमंडळ, दिनांक २६.२.२०१६
१०. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक -मवैअ २०१५/प्र.क्र.७३९/निमं/सेवा-३, दिनांक २४.६.२०१६
११. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक - मवैअ २०१५/प्र.क्र.७३०/सेवा-३, दिनांक २६.१०.२०१६

**जाहिरात क्रंमाक/आस्था-१अ/पदभ/ १११०/२०१७ दि. :- ०५/०५/२०१७** **नस्ती क्रमांक :- पदभरती -१**

१. **चंद्रपूर** या जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरतीकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.
२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट - अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **www.chanda.nic.in** व **www.zpchandrapur.maharashtra.gov.in** या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात आला आहे.
३. उमेदवारांनी अर्जाचा नमूना डाऊनलोडे करून जिल्हयाच्या जिल्हाधिकारी च्या कार्यालयात हस्त बटवडयाने / नोंदणीकृत डाकेने सादर करावा.

**४. पदसंख्या :- १७**

**आरक्षण**

| | अजा | अज | विआज | भज - ब | भज - क | भज - ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| २) महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ |
| ३) खेळाडू | | | | | | | | | ० | ० |
| ४) अपंग | | | | | १ | | | | | १ |
| **एकुण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **१** | **०** | **४** |

**टिप :-** वर नमूद केल्याप्रमाणे एकुण ०४ पदापैकी १ पद अपंग व्यक्तीसाठी (अल्पदृष्टी/ अस्थिव्यंग एका पायाने अपंग) व्यक्तीसाठी राखिव आहे.

{वि.जा.(अ), भ.ज.(क), भ.ज.(ड), साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय असून वि.जा.(अ), भ.ज.(क), भ.ज.(ड), चे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर शासन आदेशानुसार सदर पदे वि.जा.(अ), भ.ज.(क), भ.ज.(ड), मधूनआंतरपरिवर्तनीय नियमानुसार भरण्यात येतील.}

मागासवर्ग, खेळाडू व अपंग यांचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

# वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**जाहिर करण्यात आल्यानुसार **वैदयकिय अधिकारी गट - अ** पदावर खालील नमूद विशेषज्ञ शाखेतील पदव्युत्तर पदविका/पदविधारक उमेदवरांना विशेष प्राधान्य देण्यात येईल:

१) भिषक
२) बालरोग तज्ञ
३) शल्यचिकित्सक
४) स्त्रीरोगतज्ञ
५) भुल तज्ञ
६) अस्थीव्यंगोपचार तज्ञ
७) नेत्ररोग तज्ञ
८) त्वचारोग तज्ञ
९) शरीरविकृती तज्ञ
१०) क्ष किरण तज्ञ
११) मानसोपचार तज्ञ
१२) रक्तसंक्रमण अधिकारी

५. अपंगासाठी आरक्षण : शासन अधिसुचना सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अपंग २०५४ आ-२ दिनांक २७ जुलै २००४ नुसार अपंग उमदेवारांमधील फक्त क्षीणदृष्टी व अस्थिव्यंग(एका पायाने अपंग) उमेदवारच सदर पदासाठी पात्र असून जो उमेदवार अश्या प्रकारच्या अपंगाचे स्पष्टपणे नमूद केलेले प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रकियेत विचार होईल. अपंगासाठीचे आरक्षण हे शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.अपंग २००७/प्र.क्र.६१ सुधार ३ दिनांक २० एप्रिल २००६ नुसार अवलंबविण्यात आले आहे.

६. वेतनश्रेणी १५६०० - ३९१०० + ग्रेडवेतन रू. ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते अंदाजे एकत्रित वेतन रूपये ५०,००० /- शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/ प्र.क्र. ७७६ /सेवा-३ दिनांक १४ डिसेंबर २०११ अन्वये पदव्युत्तर, पदविकाधारक उमदेवारांना अतिरिक्त वेतनवाढीव पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना तीन अतिरिक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदविधारक उमेदवारांना ६ अतिरिक्त वेतन वाढी अनुज्ञेय राहतीलत्यामुळे विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन एमबीबीएस अहर्ताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यापेक्षा जास्त असेल.

**७. वय**

७.१ **दिनांक ०५ मे, २०१७ रोजी** ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियमाप्रमाणे शिथिलक्षम.

७.२ शासकिय वैद्यकीय सेवेत स्थायी/अस्थायी/बंधपत्रीत स्वरूपात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

७.३ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-२०११/४४५/११/सेवा-३ दिनांक ३ आक्टोंबर २०१३ यामधील नमूद विशेषज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेषज्ञ शैक्षणिक अहर्ताधारण केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त १० वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

**८. शैक्षणिक अहर्ता :**

८.१ वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस.) पदासाठी सांविधीक विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिदीष्ट केलेली अन्य कोणतीही अहर्ता ;

८.२ **वैद्यकीय अधिकारी (विशषज्ञ) पदासाठी :-** सांविधीक विद्यापिठाची बालरोगचिकीत्सा किंवा शल्यचिकित्सा किंवा औषधवेद्यक किंवा स्त्रीरोगचिकित्सा किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृतीशास्त्र किवा नेत्र शल्यचिकित्सा किंवा क्ष किरणशास्त्र किंवा विकृतीशास्त्र किंवा अणुजिवशास्त्र किंवा शरीर किंवा रक्त संक्रमण या विशेषज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिदीष्ट केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी.

८.३ **दिनांक ०५ मे, २०१७ रोजी** या दिनांकापूर्वी अथवा दिनांकास आंतरवासियता कालावधी पुर्ण करणारे उमेदवार पात्र ठरतील.

८.४ शुध्द आयुर्वेध/ बीएमस शैक्षणिक अहर्ताधारक उमेदवारांनी या पदासाठी अर्ज करू नये.

८.५ मागासवर्गीय पदांचे आरक्षणाकरीता नॉनक्रिमीलीअर व जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक.

९. **निवड प्रक्रिया :-**

**एकूण १०० गुण**

| पतशिल | एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण (Weightage) | पदव्युत्तर पदवी/पदविका शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण (Weightage) |
|---|---|---|
| पदवी परिक्षेच्या सर्व वर्षामध्ये मिळालेले सरासरी गुण. | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) | लागू नाही |
| पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परिक्षेमध्ये मिळालेली सरासरी गुण | लागू नाही | ६०टक्के (जास्तीत जास्त ६० गुण) |
| शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरूपात केलेली एकूण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ३ गूण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ३ गूण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| शासन सेवेत नसल्यास पदवी परिक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकूण वर्ष | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| **एकूण** | १०० | १०० |

**टिप :-**

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मवैअ/१०५/३००/प्र.क्र.३६६/सेवा-३ दिनांक १९ जून २०१० अन्वये आदिवासी जिल्हयातील आरोग्य संस्था घोषित करण्यात आल्या असून सदर आरोग्य संस्थामधील वैद्यकीय अधिकारी पदावरील कामाच्या अनुभव मुल्यांकनासाठी विचारात घेण्यात येईल.

२) उमदेवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित संस्था / कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

३) उमेदवाराची सेवा ही प्रत्येक सहामाही मध्ये मोजण्यात येईल. सहा महिन्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण (Weightage) देण्यात येणार नाहीत.

४) अनुभवासाठीच्या गुणांच्या मुल्यांकनासाठी ३० नोव्हेंबर २०१६ हा अंतिम दिनांक राहील.

५) निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार गुणांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/ प्रमाणपत्रे यांच्या साक्षांकित प्रती उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाचा अर्ज रद्दबातल करण्यांत येईल.

६) प्राप्त अर्जाची छानणी करून दिनांक २६/१०/२०१६ च्या शासन परिपत्रकानुसार गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत व दिनांक २४/०६/२०१६ च्या शासन परिपत्रकात नमूद विहित कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

७) केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणाचा पसंतीक्रम दर्शविण्याकरीता समुपदेशनाकरीता बोलविण्यात येईल.

८) समितीने सादर केलेली गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीचा पसंतीक्रम याची तापसणी करून उमेदवारास नियुक्ती आदेश **www.chanda.nic.in** व **www.zpchandrapur.maharashtra.gov.in** या शासन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९) नियुक्ती आदेशानंतर संबंधित वैद्यकिय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी रूजू झाल्यानंतर त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात येईल.

१०) नवनियुक्त वैदयकिय अधिकाऱ्यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील. त्यांचे वेतन हे बायोमेट्रिक हजेरीशी सलग्ण असेल.

**१० सर्वसाधारण :-**

१०.१ निवड झालेले उमेदवारांना दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी असेल.

१०.२ महाराष्ट्र वैदयकिय आणि आरोग्य सेवा गट- अ (वेतनश्रेणी रूपये १५६०० - ३९१०० + ग्रेड वेतन रूपये ६६००) या पदावर पदोन्नतीकरीता उमेदवारास संधी असून त्याकरीता त्या पदाकरीता आवश्यक असलेल्या अर्हता पूर्ण करणे आवश्यक राहील.

१०.३ निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

१०.४ निवड झालेल्या उमेदवाराने "ते किमान ५ वर्षाची शासकिय सेवा करतील किंवा न केल्यास शासनाने वेळोवेळी विहित केलेली रक्कम दंड म्हणून भरण्यास तयार आहेत असे बंधपत्र देणे अनिवार्य असेल.

१०.५ निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट १९६५ (महराष्ट्र LXVI,१९६५) किंवा इंडियन मेडीकल कौन्सिल ॲक्ट१९५६ (१९५६ चा १०२) नुसार त्याचे / तिचे नांव नोंदविणे अनिवार्य आहे.

**११. महत्वाचे:**

११.१ उमेदवरांनी १०० रूपयांच्या मुद्रांकपत्रावर नोटरी समोर आवेदनपत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकते बाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

११.२ प्रतिज्ञापत्र नमुना **www.chanda.nic.in** व **www.zpchandrapur.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

११.३ आवेदन पत्रासोबत सदर प्रतिज्ञापत्र जाडून पाठविणे आवश्यक आहे.अन्यथा आवेदनपत्र अपूर्ण संमजून फेटाळले जाईल.

११.४ प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवरांनी सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**१२. अर्ज :-**

१२.१ सदर अर्ज **www.chanda.nic.in** व **www.zpchandrapur.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०७/०५/२०१७ पासून उपलब्ध होतील.

१२.२ उमेदवाराने खाली नमूद केलेल्या शुल्कांचा राष्ट्रीयकृत बँकेचा डीमांड ड्राफ्ट **जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर** यांचे नावे काढून अर्जासोबत जोडावा आणि संपूर्ण भरलेला अर्ज नमूद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती व प्रतिज्ञापत्र त्यासोबत जोडावे.

१२.३ मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक कागदपत्रासह पुर्ण भरलेला अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे कार्यालयास **दिनांक २०/०५/२०१७** पुर्वी पाठवियात यावा. **( प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक उपरोक्त संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)**

१२.४ उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

१२.५ ऑनलाईन अर्जाच्या उपलब्धतेसंबंधी कोणतीही अडचण असल्यास उमेदवाराने दुरध्वनी क्रमांक ०७१७२ - २५३२७५ वर संपर्क साधावा.

**१३. शुल्क :-**

अ. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी - रू. ३०० /-

ब. फक्त राष्ट्रीयकृत बँकेच्या डीमांड ड्राफ्टद्वारे शुल्क अदा करण्यात यावे.

**स्थळ :- चंद्रपूर**

दिनांक:- ०५/०५/२०१७

**जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**